
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | बुधवार, 20 मे 2026 | अंक क्र. 357 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# उकाड्याने हैराण मुंबईकरांना दिलासा; मुंबईत ५ जूनपूर्वीच पावसाचे आगमन होण्याची शक्यता!

■ **मुंबई : वृत्तसंस्था**



मुंबईकरांनो, आता छत्र्या आणि रेनकोट तयार ठेवा! प्रचंड उकाड्याने हैराण झालेल्या मुंबईकरांसाठी अखेर दिलासादायक बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या मुंबईत आता वरुणराजाच्या आगमनाची चाहूल लागली असून येत्या शुक्रवारपासून मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. त्यामुळे मुंबईकरांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

मुंबई आणि उपनगरांमध्ये गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी वाढ झाली आहे. वाढलेला उकाडा, दमट हवामान आणि प्रखर उन्हामुळे नागरिक त्रस्त झाले होते. अशातच आता हवामान विभागाच्या अंदाजामुळे मुंबईकरांना काहीसा दिलासा मिळणार आहे. हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, शुक्रवारपासून मुंबईसह ठाणे, नवी मुंबई आणि आसपासच्या भागात मान्सूनपूर्व पावसाची सुरुवात होऊ शकते. दरम्यान, दक्षिण कोकणात गेल्या ४८ ते ७२ तासांपासून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. अनेक ठिकाणी ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळत आहेत. हा पावसाचा पट्टा आता हळूहळू उत्तर कोकणाच्या दिशेने सरकत असून आठवड्याच्या अखेरीस तो मुंबईत पोहोचण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत मुंबईतील वातावरणात मोठा बदल जाणवू शकतो.

हवामान विभागाने यंदा मान्सून वेळेपूर्वी दाखल होण्याची शक्यता देखील वर्तवली आहे. केरळमध्ये यंदा २६ मेपर्यंत मान्सून पोहोचू शकतो, जो नेहमीच्या १ जूनच्या तारखेपेक्षा जवळपास आठवडाभर आधी आहे. जर मान्सूनचा प्रवास याच वेगाने सुरू राहिला, तर महाराष्ट्रात २ जूनपर्यंत आणि मुंबईत ५ जूनच्या आसपास मान्सूनचे अधिकृत आगमन होऊ शकते. विशेष म्हणजे, मुंबईत मान्सून दाखल होण्याची सर्वसाधारण तारीख ११ जून मानली जाते. त्यामुळे यंदा मान्सून लवकर दाखल होण्याची शक्यता अधिक बळावली आहे. गेल्या काही वर्षांतील मान्सूनच्या आगमनाच्या तारखांवर नजर टाकली, तर मोठी तफावत दिसून येते. २०२४ मध्ये मुंबईत २६ मे रोजी मान्सूनचे विक्रमी लवकर आगमन झाले होते. गेल्या ७५ वर्षांतील हे सर्वात लवकर आगमन मानले गेले. तर २०२३ मध्ये बिपरजॉय चक्रीवादळाच्या प्रभावामुळे मान्सून तब्बल २५ जूनला मुंबईत पोहोचला होता, जे सर्वात उशिरा झालेले आगमन ठरले. त्याआधी २०२२ मध्ये ११ जून, २०२१ मध्ये ९ जून आणि २०२० मध्ये १४ जून रोजी मान्सून मुंबईत दाखल झाला होता.

यंदा मात्र मान्सून वेळेच्या आधीच येण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने शेतकऱ्यांपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सर्वांचेच लक्ष आता हवामान विभागाच्या पुढील अंदाजाकडे लागले आहे. दरम्यान, शुक्रवारपासून पावसाच्या सरी सुरू होण्याची शक्यता असल्याने मुंबईकरांनी घराबाहेर पडताना छत्री आणि रेनकोट सोबत ठेवण्याचा सल्ला दिला जात आहे.

# खरीप २०२५ मधील प्रलंबित पीक विम्यासाठी धनंजय मुंडेंच्या मागणीनुसार २६ मे रोजी मुंबईत बैठक

**प्रचंड अतिवृष्टी होऊनही शेतकरी पिकविम्यापासून वंचित, धनंजय मुंडेंनी तोडगा काढण्यासाठी राज्य स्तरावर बैठकीची केली होती मागणी : कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांच्या दालनात होणार बैठक**

■ **मुंबई (प्रतिनिधी)**



मागील वर्षी सन २०२५ मध्ये खरीप हंगामात प्रचंड अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले होते मात्र बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप पीकविमा मिळालेला नाही, याच पार्श्वभूमीवर माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार येत्या २६ तारखेला (मंगळवार) कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली व आ. धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत मुंबईत बीड जिल्ह्यातील प्रलंबित पीक विम्याच्या प्रश्नी तोडगा काढण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीस कृषी विभाग, जिल्हा प्रशासन तसेच संबंधित विमा कंपनीचे राज्यस्तरीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

मागील वर्षी बीड जिल्ह्यात विशेषकरून खरीप हंगामाच्या शेवटी पिके काढणीच्या तोंडावर सातत्याने प्रचंड अतिवृष्टी, ढगफुटी व जिल्हाभर पूरपरिस्थिती निर्माण होऊन शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले होते, मात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पीकविमा अद्याप मिळालेला नाही. विमा कंपन्यांचे धोरण आणि पीकविमा योजनेत झालेले बदल यामुळे पात्र असूनही बीड जिल्ह्यातील शेतकरी वंचित असून यावर तोडगा काढण्यासाठी राज्य शासन स्तरावर बैठक घेऊन तोडगा काढण्याची विनंती धनंजय मुंडे यांनी काही दिवसांपूर्वी पत्राद्वारे केली होती. त्यानुसार कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या निर्देशानुसार कृषी विभागाने ही बैठक बोलावली आहे. धनंजय मुंडे हे स्वतः मागील काळात कृषीमंत्री असताना देशात मागील दहा वर्षांच्या इतिहासातील सर्वाधिक पीकविमा महाराष्ट्रात मंजूर करण्यात आला होता. विमा कंपन्यांच्या नफेखोरी तसेच निकषांना फाटा देत तांत्रिक बाबींच्या आधारे मुंडेंनी विमा कंपन्यांना विमा देण्यास भाग पाडले होते, त्यामुळे पुढील आठवड्यात होणाऱ्या या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून शेतकऱ्यांना आपल्या हक्काचा पीकविमा मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

# सर्वसामान्यांना पुन्हा झटका! पेट्रोल-डिझेलच्या दरात चार दिवसांत दुसऱ्यांदा वाढ

■ **मुंबई : वृत्तसंस्था**



पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा मोठा फटका बसला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना इंधनाचा वापर जपून करण्याचे आवाहन केल्यानंतर इंधनदर वाढीची शक्यता व्यक्त केली जात होती. आता ती भीती खरी ठरताना दिसत असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अवघ्या चार दिवसांत दुसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे.

यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये, तर डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा दरवाढ जाहीर करण्यात आली आहे. मंगळवारी सकाळपासून नवे दर लागू झाले असून देशभरातील विविध शहरांमध्ये पेट्रोल-डिझेल महागले आहे. दिल्लीमध्ये पेट्रोलच्या दरात ८७ पैशांची वाढ झाली असून आता प्रतिलिटर पेट्रोलचा दर १०७ रुपयांच्या पुढे गेला आहे. तर डिझेलच्या दरात ९१ पैशांची वाढ झाली असून प्रतिलिटर डिझेल ९४ रुपयांच्या जवळ पोहोचले आहे. मुंबई, कोलकाता आणि चेन्नईमध्येही इंधनदरात वाढ झाली आहे.

इराण-अमेरिका आणि इस्त्रायलमधील वाढत्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत मोठी उसळी आली आहे. त्यामुळे भारतीय तेल कंपन्यांवर आर्थिक दबाव वाढला असून त्याचा परिणाम थेट सर्वसामान्यांवर होत आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका संपल्यानंतर केंद्र सरकारने इंधनदरवाढीचा काही भार नागरिकांवर टाकल्याची चर्चा देखील सुरू झाली आहे. दरम्यान, अवघ्या काही दिवसांत सलग दुसऱ्यांदा इंधनदर वाढल्याने महागाई आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वाहतूक खर्च वाढल्याने भाजीपाला, अन्नधान्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किंमतीवरही परिणाम होऊ शकतो.

# प्रतीक्षा संपली! देशातील पहिल्या 'बुलेट ट्रेन'ची पहिली झलक; दिल्लीत झळकावले चित्र

■ **नवी दिल्ली :**



भारतातील बहुचर्चित आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा 'मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन' (Mumbai-Ahmedabad Bullet Train) प्रकल्पाने आणखी एक प्रतिकात्मक टप्पा गाठला आहे. देशातील या पहिल्या हायस्पीड ट्रेनचा पहिला अधिकृत फोटो (First Photo Of Mumbai-Ahmedabad Bullet Train) आता समोर आला असून, नवी दिल्लीतील रेल्वे मंत्रालयाच्या 'गेट नंबर ४' वर तो मोठ्या अभिमानाने प्रदर्शित करण्यात आला आहे. हे आकर्षक चित्र देशाच्या प्रगत रेल्वे प्रवासाच्या नव्या युगाची नांदी मानले जात असून, प्रकल्पाच्या दिशेने टाकलेले हे एक मोठे पाऊल आहे.

महाराष्ट्र आणि गुजरात या दोन प्रमुख राज्यांना जोडणाऱ्या ५०८ किलोमीटर लांबीच्या या 'हायस्पीड रेल' कॉरिडॉरचे काम जपानच्या आर्थिक आणि तांत्रिक सहकार्याने अत्यंत वेगाने सुरू आहे. ताशी तब्बल ३२० किलोमीटर वेगाने धावणाऱ्या या बुलेट ट्रेनमुळे प्रवासाच्या वेळेत क्रांतीकारी बदल होणार आहे. ही ट्रेन मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथून निघून ठाणे, विरार, बोईसर, वापी, बिलीमोरा, सुरत, भरुच, वडोदरा, आनंद आणि अहमदाबादमार्गे साबरमतीपर्यंत धावेल. सुरत, वडोदरा आणि अहमदाबाद अशा मोजक्याच थांब्यांसह हा ५०८ किमीचा संपूर्ण प्रवास अवघ्या २ तास ७ मिनिटांत पूर्ण होईल. सध्याच्या रस्ते किंवा रेल्वे प्रवासाच्या तुलनेत हा वेग थक्क करणारा आहे.

कोणत्याही मोठ्या प्रकल्पातील सर्वात मोठा अडथळा भूसंपादनाचा असतो. मात्र, फेब्रुवारी २०२६ मध्ये रेल्वे मंत्रालयाने स्पष्ट केल्यानुसार प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या संपूर्ण १,३८९.५ हेक्टर जागेचे भूसंपादन १०० टक्के पूर्ण झाले असून सर्व वैधानिक परवानग्याही मिळवण्यात आल्या आहेत. यानंतर संपूर्ण कॉरिडॉरच्या बांधकामाला प्रचंड वेग आला आहे. एकूण १२ नियोजित स्थानकांपैकी गुजरातमधील वापी, बिलीमोरा, सुरत, भरुच, आनंद, वडोदरा, अहमदाबाद आणि साबरमती या आठ स्थानकांचे पायाभरणीचे (Foundation) काम पूर्ण झाले आहे. महाराष्ट्रातही ठाणे, विरार आणि बोईसर येथे काम युद्धपातळीवर सुरू असून, बीकेसी येथील भूमिगत स्थानकाचे उत्खनन जवळपास अंतिम टप्प्यात आले आहे.

या प्रकल्पाच्या उभारणीत भारतीय आणि जपानी अभियंत्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे. आतापर्यंत तब्बल १७ नद्यांवरील पुलांचे बांधकाम यशस्वीरीत्या पूर्ण झाले असून, नर्मदा, तापी, माही आणि साबरमती यांसारख्या मोठ्या नद्यांवरील भव्य पुलांचे काम वेगाने सुरू आहे. तसेच ठाणे, सुरत आणि साबरमती येथे ट्रेनच्या देखभालीसाठी डेपो उभारणीचे कामही सुरू आहे. या प्रकल्पातील सर्वात आव्हानात्मक टप्पा म्हणजे महाराष्ट्रातील २१ किलोमीटर लांबीचा समुद्राखालून जाणारा भुयारी मार्ग अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अत्यंत गुंतागुंतीच्या भुयारी मार्गाचे कामही वेगाने सुरू असून घणसोली आणि शिळफाटा दरम्यान आतापर्यंत तब्बल ४.८ किलोमीटरचे उत्खनन पूर्ण झाले आहे.

औद्योगिक विकासाला आणि कनेक्टिव्हिटीला मिळणार मोठी चालना भारतीय रेल्वेच्या मते, हा हायस्पीड कॉरिडॉर केवळ प्रवाशांचा प्रवासच सुखकर करणार नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेलाही नवी गती देईल. या प्रकल्पामुळे प्रमुख औद्योगिक क्षेत्रांची कनेक्टिव्हिटी मोठ्या प्रमाणावर सुधारेल. विशेषतः बोईसर स्थानकामुळे आगामी काळात विकसित होत असलेल्या 'वाढवण बंदर' प्रकल्पाला या बुलेट ट्रेनचा खूप मोठा फायदा होणार असून, यामुळे मालवाहतूक, व्यापार आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत मिळणार आहे.

# ३८ बॉलमध्ये ९३ धावा! वैभवच्या तडाख्याने ४ टीमना धक्का

मुंबई : आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सने लखनऊ सुपर जाएंट्सचा तब्बल ७ विकेट्स राखून पराभव करत प्लेऑफच्या शर्यतीत मोठी खळबळ उडवून दिली आहे. या सामन्यात राजस्थानच्या युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने खेळलेली तुफानी खेळी चर्चेचा विषय ठरली. त्याच्या वादळी फलंदाजीमुळे केवळ राजस्थानलाच विजय मिळाला नाही, तर प्लेऑफचे संपूर्ण समीकरणही पुन्हा बदलले आहे.


प्रथम फलंदाजी करताना लखनऊ सुपर जाएंट्सने राजस्थानसमोर २२१ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. मिचेल मार्शने ९६ धावांची दमदार खेळी केली, तर जोश इंग्लिसने ६० धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. या दोघांच्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर लखनऊने २० षटकांत २२० धावा उभारल्या. या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात आक्रमक झाली होती. यशस्वी जयस्वालने ४३ धावांची खेळी करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. मात्र तो बाद झाल्यानंतर मैदानात आलेल्या वैभव सूर्यवंशीने लखनऊच्या गोलंदाजांवर अक्षरशः हल्लाबोल केला. त्याने अवघ्या ३८ चेंडूंमध्ये ९३ धावांची स्फोटक खेळी करत सामन्याचे चित्रच बदलून टाकले. वैभवचे शतक अवघ्या काही धावांनी हुकले, पण त्याच्या खेळीमुळे राजस्थान विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचला.

# खा.बजरंग सोनवणे यांच्या प्रयत्नांना मोठे यश

## गेवराई तालुक्यातील 'एमडीआर-२० ते यमगरवाडी' रस्ता कामाला मंजुरी!

## प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-४ अंतर्गत निधी मंजूर; ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

■ **बीडः प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचा आणि दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यासाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. तालुकयातील L021 एमडीआर-२० ते यमगरवाडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-४' (PMGSY-IV) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. बीडचे खा. बजरंग सोनवणे यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक प्रयत्नांना यामुळे मोठे यश आले असून, या रस्त्यासाठी १ कोटी ३७ लक्ष २९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने (नवी दिल्ली) १८ मे २०२६ रोजी या कामाला अधिकृत मंजुरी दिली असून, यामुळे परिसरातील ग्रामस्थांची अनेक वर्षांची मोठी अडचण दूर होणार आहे. गेवराई तालुक्यातील एमडीआर-२० ते यमगरवाडी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेण्यासाठी, विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी आणि रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. या रस्त्याचे खडीकरण आणि डांबरीकरण व्हावे, अशी आग्रही मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात होती.ग्रामस्थांची हीच गरज ओळखून खासदार बजरंग सोनवणे यांनी दिल्ली दरबारी आणि संबंधित मंत्रालयाकडे या रस्त्याच्या मंजुरीसाठी विशेष पाठपुरावा केला होता. अखेर काल, १८ मे रोजी केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने या कामावर मंजुरीची मोहोर उमटवली. या एकूण १.४०० कि.मी. अंतराच्या रस्त्याचे काम आता पूर्णपणे दर्जेदार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केले जाणार आहे.

ग्रामीण भागाचा विकास करायचा असेल तर तिथले रस्ते सक्षम असणे गरजेचे आहे. यमगरवाडी रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. यासाठी मी वैयक्तिक पातळीवर सातत्याने केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडे पाठपुरावा करत होतो. अखेर या प्रयत्नांना यश आले असून, १३७.२९ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. मतदारसंघातील एकही गाव रस्त्याविना वंचित राहणार नाही, यासाठी माझे प्रयत्न सातत्याने सुरू राहतील.

■ **खा. बजरंग सोनवणे, बीड लोकसभा.**

### ग्रामस्थांकडून जल्लोष आणि आभार

■ **या रस्त्याला मंजुरी मिळाल्याची बातमी समजताच यमगरवाडी आणि परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे. अनेक वर्षांचा रखडलेला प्रश्न मार्गी लावल्याबद्दल गावकऱ्यांनी खा.बजरंग सोनवणे यांचे विशेष आभार मानले आहेत. रस्ता मंजुरीमुळे आता या भागातील वाहतूक सुसाट होणार असून, परिसराच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळणार आहे. या कामाचे भूमिपूजन लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडणार आहे.**

# संपादकीय

## एआय सर्वांसाठी

सन २०२५-२६ पासून भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय या क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले. केंद्रीय चौकट जी २०२५ मध्येच निश्चित करण्यात आली होती. तिला आता व्यापक स्वरूप देण्यात आले. दिल्लीच्या भारत मंडपम येथे परिषद भरत आहे. एआय तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ तंत्रज्ञान म्हणून न करता तिचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी आणि विकास करण्याचा उद्देश आहे.

सुरुवातीला या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी १०,३७१.९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या द्वारे एआय संपूर्ण भारतासाठी कसे उपयुक्त ठरेल आणि मूलभूत मॉडेल्स आणि डेटा बेसेसाठी एआय तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरेल हे या परिषदेतून सांगितले जाईल. विषय सर्वसामान्यांना थोडा कळण्यास अवघड आहे. पण यासाठीच परिषद आहे. एआयचा उपयोग करून सामान्यांचे जीवन कसे सुसह्य करता येईल. लोकसमूह, ग्रह आणि प्रगती ही ती सूत्रे आहेत. ज्यांच्या भोवती परिषदेत काम केले जाईल आणि ही सूत्रे समावेशकता, शाश्वत आणि मानवी केंद्रीत एआय या भोवती रचना तयार करण्यात आली.

लोकसमूह याचा अर्थ मानव केंद्रित एआय असून मानवतावादाची सेवा मानवांचे हक्क आणि सार्वजनिक सेवांप्रती सर्व लोकांना अधिकार तसेच विश्वासाची बांधणी करून देता येतो यावर हे सूत्र आधारलेले आहे. एआय समावेशक आणि मानवी प्रतिष्ठा यांना आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा आदर राखून जपवणूक करेल असे दुसरे सूत्र आहे. आपला ग्रह पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत एआय पद्धतींना अनूकूल राहील असाही उद्देश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊर्जा सक्षम तंत्रज्ञान आणि जबाबदारीने वापर करून हवामान कृतींना पाठिंबा देईल अशी लवचिकता प्रदान करेल असे तंत्रज्ञान उभारणे असा आहे. भारतात भरणाऱ्या परिषदेची व्याप्ती इतकी मोठी आहे, की भारत मंडपम येथे भरणाऱ्या परिषदेत २.५ लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. यात परदेशातून फ्रान्सचे ईमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझिलचे लुला डासिल्व्हा, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेझ आदींसह उपस्थित रहाणार आहेत आणि परदेशातून तज्ज्ञ या परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यात सुंदर पिचाई, सेमी कंडक्टर आणि फाईव्ह जी तंत्रज्ञान राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले क्रिस्तियानो एमोन आदींचा समावेश आहे.

नवी दिल्लीत सुरू होणारी परिषद ही भारतासाठी अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे आणि एआय धोक्यांचे कसे व्यवस्थापन करायचे हे शिकवणारी आहे. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनाला रुळावर व्यवस्थित कसे ठेवायचे याचाही विचार केला जाणार आहे. याची जी चौकट आखली आहे ती एआयचा वापर करताना पक्षपात आणि गैरवापराला आळा घालणे आणि तसे करतानाही भारताचे हेतू जबाबदार एआय व्यवस्थापन करणे यापुरते मर्यादित आहे. या परिषदेतून भारताचा हेतू हा स्पष्ट होतो, की जबाबदार एआय गव्हर्नन्सला आकार देण्याचा आहे. पण यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एआयच्या मार्गदर्शक तत्त्वे जी आहेत ती आरोग्य, शिक्षण, कृषी आणि वित्त यात कशी उपयोगात आणली जातील यावर विचार करण्याचा आहे. कठोर नियंत्रणाशिवाय चौकटीने सात व्यापक सूत्रे निश्चित केली आणि जी धोरणकर्ते आणि उद्योग या दोघांनाही मार्गदर्शन करतील. यामध्ये विश्वास हा पाया, पीपल फर्स्ट म्हणजे लोक सर्वोपरी, संशोधनापेक्षा संयम महत्त्वाचा आणि समानता आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. या सूत्रांचा यावर भर आहे, की एआय सिस्टीमनी मानवी निर्णय प्रक्रियेला पाठिंबा दिला पाहिजे आणि तरीही ते पारदर्शक आणि कोणतेही पक्षपात टाळून साध्य करता आले पाहिजे. या परिषदेचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य हे आहे, की सध्याच्या कायद्यावरील अवलंबितता. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, की अनेक एआयशी संबंधित धोके हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत समाविष्ट आहेत आणि त्यात आयटी नियमावली आणि गुन्हेगारी कायदे यांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्वांत असे सांगितले आहे, की एआय डेव्हलपर्स आणि डिप्लॉयर्सकडून काय अपेक्षा आहे. संशोधनाला प्राधान्य देऊन सरकारने केवळ ते एआयचा प्रमुख वापर करणारे नाही तर जबाबदार आणि समावेशक कारभार जो भारताचा २०४७ साली साकार होणारा विकसित भारत दृष्टिकोन साध्य करणारा असेल असे सिद्ध करू पाहत आहे.

एआयचा उपयोग विविध कारणांसाठी होतो आणि हेच या परिषदेचे सार आहे. रोजगार, भाषा, नवीन रोजगार मिळवणे, सार्वजनिक सेवा आणि सामान्य लोकांना लाभप्रद होतील अशा योजना राबवणे यासाठी एआयचा उपयोग कसा करता येईल या दृष्टीने या परिषदेत विचार केला जात आहे. ब्रिटनचे उपपंतप्रधान डेव्हीड लॅमी आणि एआय मंत्री कनिष्क नारायण हे भारतात आलेल्या शिष्ट मंडळात आहेत. त्यांनी सांगितले, की एआयचा उपयोग करून रोजच्या जीवनात कसा सामान्याना लाभ करून देता येईल आणि जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात एआयचा उपयोग करून डॉक्टर त्वरीत रोगनिदान करतील, शिक्षक शिकवण्यात नवनवीन पद्धती आणतील आणि परिषदा सेवा झटपट देऊन उद्योग नवीन जनरेशनचे रोजगार तयार करतील हे पहाण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. एआय हे अभूतपूर्व वचन देते की जागतिक आव्हानांना जसे की सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण आणि शेतीत उत्पादकता वाढवणे आणि त्यासोबतच मानवी हक्कांचा आदर करणे याबाबत क्रांतिकारी आहे. एआय पद्धतींचा वापर जर उपयोगकर्ते आणि विकासक यांच्यामार्फत झाला तर समाजाला त्याचा शेवटी प्रचंड लाभ होऊ शकतो. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असूनही भारतात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि डिजिटल बाजारपेठांपैकी ती सर्वात वेगाने वाढणारी आहे. मानवता, समावेशक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एआयचा उपयोग केला पाहिजे असे जे भारताचे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले ते अगदीच योग्य आहे. ही शिखर परिषद राष्ट्रीय क्षमता, आर्थिक लवचिकता आणि दीर्घकालीन क्षमतांचा सक्षम देश म्हणून भारताची ओळख निश्चित करेल. अत्यंत झपाट्याने बदलत असलेल्या एआयचे जग समजण्यासाठी आणि एआयचा उद्देश्य सामान्य जनांपर्यंत पोहोचवणे हा या परिषदेचा हेतू आहे. भारत भरवत असलेल्या या परिषदेची संकल्पना आहे. सर्वजन हिताय सर्वजन सुखाय. हा हेतू सर्व काही सांगून जाणारा आहे. यावेळी परिषदेचा हेतू एआयपासून धोका हा केवळ नाही तर एआयपासून सामान्य लोकांना होणारा फायदा हाही आहे.

# सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे व्यक्तिमत्व : पत्रकार मा. संतोषभाऊ जुजगर

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेमध्ये सत्य, सामाजिक बांधिलकी आणि जनहित जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे मा. श्री. संतोषभाऊ जुजगर. पत्रकारिता ही फक्त बातम्या देण्यापुरती मर्यादित नसून समाजातील वास्तव परिस्थिती लोकांसमोर मांडण्याचे मोठे माध्यम आहे. ही जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आणि धाडसाने पार पाडण्याचे कार्य संतोषभाऊ जुजगर यांनी सातत्याने केले आहे.

आपल्या लेखणीच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवले. गावपातळीवरील अनेक समस्या, नागरिकांच्या अडचणी, शेतकरी, युवक आणि वंचित घटकांचे प्रश्न यांना त्यांनी आपल्या बातम्यांमधून प्रभावीपणे वाचा फोडली. त्यांच्या निर्भीड पत्रकारितेमुळे अनेक प्रश्नांना न्याय मिळण्यास मदत झाली आहे.

संतोषभाऊ जुजगर यांची पत्रकारिता ही कोणत्याही दबावाखाली न येता सत्य मांडणारी आहे. स्पष्ट भूमिका, अभ्यासू वृत्ती आणि समाजाविषयीची तळमळ यामुळे त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. अनेक वेळा त्यांनी समाजहिताच्या विषयांवर प्रभावी लिखाण करत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.



पत्रकारितेसोबतच सामाजिक, धार्मिक आणि जनजागृतीपर उपक्रमांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग असतो. विविध सामाजिक कार्यक्रम, युवकांना मार्गदर्शन, गरजूंसाठी मदत आणि समाजामध्ये सकारात्मक विचार निर्माण करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत असतात. समाजातील अनेकांना प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते. त्यांच्या स्वभावातील साधेपणा, प्रामाणिकपणा आणि माणुसकी हीच त्यांची खरी ताकद आहे. पत्रकारितेला समाजसेवेचे माध्यम मानून त्यांनी केलेले कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. सत्यासाठी लढणारा आणि जनतेच्या प्रश्नांसाठी झटणारा पत्रकार म्हणून त्यांनी लोकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगातही वस्तुनिष्ठ पत्रकारिता टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत संतोषभाऊ जुजगर यांच्यासारखे पत्रकार समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेक युवक पत्रकारितेकडे सकारात्मक दृष्टीने पाहत आहेत. त्यांच्या लेखणीला अधिक सामर्थ्य लाभो, समाजहिताचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात घडत राहो आणि त्यांना निरोगी, आनंदी व यशस्वी आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**■ मा. श्री. संतोषभाऊ जुजगर यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!**
**– बालाजी ढगे, पत्रकार**

## लोकमानस

### मुलखावेगळी माणस
### सर्वात लहान वयाचा मानांकित बुद्धिबळपटू : अनिश

भारताच्या ३ वर्षांच्या अनिश सरकारला भेटा, जो सर्वात कमी वयाचा मानांकित बुद्धिबळपटू ठरला आहे. त्याच्या वयाची बहुतेक मुले पेप्पा पिग किंवा छोटा भीमसारख्या कार्टूनमध्ये किंवा खेळण्यांशी खेळण्यात रमलेली असताना, लहानग्या अनिश सरकारला बुद्धिबळाच्या सोंगट्यांच्या शांत डावपेचांमध्ये आकर्षण वाटू लागले, आणि यातूनच एका अशा प्रवासाची सुरुवात झाली ज्याची फार कमी लोक कल्पना करू शकले. उत्तर कोलकात्यातील कैखालीचा हा मुलगा गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये वयाच्या ३ व्या वर्षी इतिहासातील सर्वात लहान वयाचा फिडे मानांकित बुद्धिबळपटू बनला. बंगाल रॅपिड रेटिंग ओपन दरम्यान, त्याला एकाच वेळी अनेक खेळाडूंसोबत खेळणाऱ्या प्रदर्शनी सामन्यात भारताचा क्रमांक १ आणि जगातील क्रमांक ४ ग्रँडमास्टर अर्जुन एरिगैसीविरुद्ध खेळण्याची संधी मिळण्याचे भाग्यही लाभले.

फक्त एका आठवड्यानंतर, अनिशने पश्चिम बंगाल राज्य अंडर-१३ ओपनमध्ये पुन्हा एकदा आपल्या कौशल्याची चाचणी घेतली, जिथे त्याचा सामना मोठ्या आणि अनुभवी खेळाडूंशी झाला. ही स्पर्धा आव्हानात्मक असली तरी, पाच मानांकित खेळाडूंचा सामना करण्याची अट पूर्ण केल्यामुळे, ती त्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरली, ज्यामुळे त्याला अखेरीस १५५५ चे प्रारंभिक फिडे रेटिंग मिळाले, जे नंतर अद्ययावत करण्यात आले. असे करून, त्याने तेजस तिवारीचा पूर्वीचा विक्रम मोडला, जो वयाच्या पाचव्या वर्षी सर्वात तरुण फिडे-मानांकित खेळाडू बनला होता, असे भारताचे दुसरे ग्रँडमास्टर आणि त्याचे प्रशिक्षक दिब्येंदू बरुआ म्हणाले. "तो मला मित्राभ गुहाची आठवण करून देतो (जो वयाच्या २० व्या वर्षी जीएम झाला होता). अनिशमध्ये निश्चितच क्षमता आहे, पण त्याला अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे," असे धनुका धुन्सेरी दिब्येंदू बरुआ बुद्धिबळ अकादमीचे संचालक बरुआ यांनी पीटीआयला सांगितले. "आम्ही त्याला एका विशेष गटात ठेवले आहे, जिथे तो सात ते आठ तास सराव करतो," असे बरुआ म्हणाले. बुद्धिबळ स्पर्धांमधील अनिशच्या बहुतेक व्हिडिओंमध्ये, तो बुद्धिबळाचा पट गाठण्यासाठी खुर्च्यांच्या ढिगाऱ्यावर बसलेला दिसतो, ज्यामुळे ते दृश्य खूपच मोहक वाटते. एका व्हिडिओमध्ये, अनिश बरुआ आणि सूर्यशेखर गांगुली यांच्यासह तीन जीएम (ग्रँडमास्टर) विरुद्ध खेळताना खुर्च्यांवर तोल सांभाळत असतो, तर त्याचे प्रशिक्षक बरुआ गंमतीने त्याच्या गालाला चिमटा काढतात.

## असा लागला शोध

### शोध स्टोव्हचा

अन्न शिजविण्यासाठी, परिसर उबदार करण्यासाठी अथवा तापनासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रयुक्तीला वा साधनाला स्टोव्ह म्हणतात. स्टोव्ह सहज वाहून नेता येण्यासारखा किंवा पक्का बसविलेला असतो. एका प्रकारच्या स्टोव्हमध्ये मातीचे, चिनी मातीचे किंवा सामान्य-पणे धातूचे बंदिस्त पात्र ( टाकी ) असून त्यात इंधन व हवा यांचे मिश्रण जाळून उष्णता निर्माण होते. ही उष्णता या टाकीतून बाहेरच्या दिशेत प्रारित होते ( पसरते ) व ती वरील कामांसाठी वापरतात..असा पहिला स्टोव्ह अल्सेस ( फ्रान्स ) येथे १४९० मध्ये तयार करण्यात आला तो पूर्णपणे विटा व फरश्या (टाइल्स ) यांचा होता व त्याला धूममार्ग ( धुराडे ) होता. नंतरच्या स्कँडिनेव्हियन स्टोव्हला उंच लोखंडी धुराडे होते. त्या धुराड्यात लोखंडी



आडव्या पट्ट्या होत्या. त्या पट्ट्यांची मांडणी अशा रीतीने केली होती, की त्यामुळे बाहेर निघून जाणाऱ्या वायूचा प्रवासमार्ग अधिक लांब झाला व यामुळे कमाल उष्णता मिळविणे शक्य झाले. अमेरिकेच्या मॅसॅचूसेट्स राज्यातील लिन या गावी पहिला बिडाचा स्टोव्ह १६४२ मध्ये तयार करण्यात आला. या स्टोव्हमध्ये जाळ्या नव्हत्या व स्टोव्ह म्हणजे बिडाची पेटी होती. १७४० मध्ये बेंजामिन फ्रँक्लिन यांनी ' पेनसिल्व्हेनिया फायरप्लेस ' ( भिंतीमधील चुलाण ) शोधून काढला. तापविण्याच्या स्टोव्हची मूलभूत तत्त्वे त्यात वापरली होती. या स्टोव्हमध्ये जाळीवर लाकूड जाळीत व त्याला सरकणारी दारे होती. या दारांमुळे त्यातून जाणाऱ्या हवेच्या प्रवाहाचे नियंत्रण करता येत असे. हा स्टोव्ह सापेक्षतः लहान असल्याने तो भिंतीमधील मोठ्या चुलाण्यात बसवीत किंवा खोलीच्या मध्यभागी मोकळा ठेवून तो धुराड्याला जोडीत असत.फ्रँक्लिन स्टोव्हच्या अभिकल्पाचा प्रभाव डेऱ्यासारख्या स्टोव्हवर पडला. असे डेऱ्यासारखे स्टोव्ह हे विसाव्या शतकातही काही घरांचे परिचित असे वैशिष्ट्य होते. १८०० मध्ये फिलाडेल्फिया ( पेनसिल्व्हेनिया ) येथे आयझॅक ऑर यांनी जाळ्या बस-विलेला बिडाचा पहिला गोलाकार स्टोव्ह तयार केला. १८३३ मध्ये जॉर्डन ए. मॉट यांनी अँथ्रॅसाइट ( दगडी कोळशाचा प्रकार ) जाळणारा विशिष्ट प्रकारचा ( बेस-बर्निंग ) स्टोव्ह शोधून काढला.

## चलती का नाम गाडी

### व्होल्वो XC90 फेसलिफ्ट 2026 लवकरच

स्वीडनची प्रमुख ऑटोमोबाईल उत्पादक कंपनी व्होल्वो विविध सेगमेंटमध्ये कार ऑफर करते. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनी लवकरच एक नवीन कार लाँच करण्याची तयारी करत आहे. ही एसयूव्ही कंपनीने सप्टेंबर 2024 मध्येच ग्लोबल लेव्हलवर सादर केली होती. त्यानंतर आता या एसयूव्हीचे फेसलिफ्ट व्हर्जन इंडियन मार्केटमध्ये आणण्याची कंपनी तयारी करत आहे. एसयूव्हीच्या फेसलिफ्ट व्हर्जनमध्ये एक्सटिरियरसोबतच इंटिरियरमध्ये अनेक बदल केले जातील आणि त्यात काही नवीन फीचर्स देखील अॅड केली जातील. एसयूव्हीच्या फेसलिफ्टमध्ये नवीन डिझाइन केलेले ग्रिल, टी-साईजचे एलईडी डीआरएल, नवीन हेडलाइट्स असतील. याशिवाय, साईडच्या आणि रिअर प्रोफाइलमध्ये बदल नसतील. मोठ्या इन्फोटेनमेंट सिस्टमसह, फोर झोन ऑटो एसी, पॅनोरॅमिक सनरूफ सारखी काही नवीन फीचर्स इंटिरियरमध्ये पाहायला मिळेल.कंपनी व्होल्वो XC90 SUV मध्ये दोन-लिटर टर्बोचार्ज्ड इंजिन मिळेल. ज्यासह 48 व्ही माइल्ड हायब्रिड किंवा प्लग-इन हायब्रिड टेक्निक प्रदान केले जाऊ शकते. माइल्ड हायब्रिड इंजिनसह, ते 250 पीएस पॉवर आणि 360 न्यूटन मीटर टॉर्क मिळेल. प्लग-इन टेक्निकसह, एसयूव्हीला 455 पीएस पॉवर आणि 709 न्यूटन मीटर टॉर्क मिळेल. यासोबतच, एसयूव्हीमध्ये 8-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशन दिले जाईल आणि त्यात ऑल व्हील ड्राइव्ह देखील देण्यात येईल.

**■ - संकलन – संयोजन सुबोध रणशेवरे**



## शिवहार लहाने आदर्श शिक्षण सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

**■ (पुरंदर, पुणे)**

आचार्य अत्रे सांस्कृतिक सभागृह, सासवड, ता.पुरंदर जि. पुणे येथे रविवार दि.१७ मे २०२६ रोजी अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे जिल्हा कार्यवाह, शैक्षणिक कायद्याचे अभ्यासक, म. ए. सो. वाघीरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सासवड येथील विद्यार्थी प्रिय व उपक्रमशिल शिक्षक शिवहार लहाने यांचा शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याबद्दल आदर्श शिक्षण सेवारत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशनचे कार्य प्रेरणादायी असून, समाजात सामाजिक भान जपणारी ही संघटना कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन चित्रपट महामंडळाचे भोसले यांनी केले. संस्थापक-अध्यक्ष अप्पासाहेब भांडवलकर, प्रदेशाध्यक्ष राहुल भोंडे, अमोल लोंढे, माजी उपनगराध्यक्ष सुहास लांडगे, विजय वढणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अमोल लोंढे, गणेश महाडिक, बळीराम सोनवणे, मनोहर ताथवडकर, सुजाता गुरव, राणी भंडलकर यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी 'कलाश्री' नृत्य आविष्कार आणि पुरस्कार वितरण करण्यात आले. मंगेश गायकवाड व स्नेहा शेवाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर राहुल भोंडे यांनी आभार मानले.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## दीपक देशमुख यांनी मानले पालकमंत्र्यांसह राज्य सरकारचे आभार

# श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्रासाठी ३०१.५४ कोटींचा सुधारित आराखडा मंजूर परळीकरांच्या वतीने मंत्र्यांचे आभार!

## नियोजन विभागामार्फत काम होणार असल्याने विकासाला गती मिळणार

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर आणि परिसराच्या विकासासाठी महायुती सरकारने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मुंबईत पार पडलेल्या शिखर समितीच्या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात १५.५४ कोटींची वाढ करून आता ३०१.५४ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्याला मंजुरी देण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल परळीकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्राचा चेहरामोहरा बदलणार यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे.

या महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णयाचे स्वागत करत परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी परळीकरांच्या वतीने राज्य सरकार आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री यांचे विशेष आभार मानले आहेत.

हा निधी आता थेट नियोजन विभागात वर्ग करण्यात आल्यामुळे स्थानिक प्रशासनाच्या पातळीवर जी दिरंगाई किंवा कामात कमी-अधिकपणा होण्याची शक्यता होती, ती आता पूर्णपणे टळणार आहे. नियोजन विभागाच्या थेट नियंत्रणामुळे कामाला कमालीची गती मिळेल आणि लवकरात लवकर वैद्यनाथ तीर्थक्षेत्राचा विकास अधिक चांगल्या व दर्जेदार पद्धतीने होईल.

नुकत्याच काही दिवसांपूर्वी दीपक देशमुख यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन विविध विकास कामासंदर्भात तसेच होत असलेल्या विविध चुकीच्या कामासंदर्भात सुनेत्राताई यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली होती. आणि त्यानंतर झालेल्या या बैठकीमध्ये परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये वाढीव झालेला हा निधी नक्कीच परळीकरांसाठी एक अभिमानाची बाब आहे नक्कीच यामुळे वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचा अधिक विकास होण्यास मोठी मदत होणार आहे.





*परळीच्या विकासाला गती देणाऱ्या या ऐतिहासिक निर्णयासाठी आणि विशेष बाब म्हणजे नियोजन समितीकडे काम गेल्यामुळे होणारा भ्रष्टाचार कमी होईल. या निर्णयामुळे मी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे सर्व परळीकरांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानतो."* **— दीपक देशमुख**

# इंधन दरवाढीचा भडका! पेट्रोल-डिझेल महागल्याने वाहनधारक आणि नागरिक हैराण




**सिरसाळा/अतुल बडे**

गेल्या काही दिवसांपासून सर्वसामान्यांच्या खिशाला बसणारी कात्री आता अधिकच धारदार झाली आहे. सिरसाळा आणि परिसरात डिझेल आणि पेट्रोलच्या दरांमध्ये मोठी वाढ झाल्याने वाहन मालक आणि नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिरसाळा येथे आजचे इंधनाचे दर

पेट्रोल ₹१०९.५३ प्रति लीटर डिझेल ₹९६.०८ प्रति लीटर डिझेलचे दर तब्बल ९६.०८ रुपयांच्या पार गेल्यामुळे मालवाहतूकदार आणि शेतकरी वर्गाचे कंबरडे मोडले आहे. डिझेल महागल्याने येत्या काळात जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला आणि ट्रॅव्हल्सचे भाडे वाढण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. तर दुसरीकडे, पेट्रोलच्या वाढत्या किमतींमुळे नोकरदार आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांचे मासिक बजेट पार कोलमडून गेले आहे.या वाढत्या महागाईमुळे 'बजेट कसं सांभाळायचं?' असा संतप्त सवाल आता सिरसाळ्यातील नागरिक आणि वाहन चालक विचारत आहेत. इंधनाचे दर कमी होऊन नागरिकांना कधी दिलासा मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

***"आधीच महागाईने तोंडात पाणी आणले आहे, त्यात आता रोजच्या प्रवासासाठी लागणारे पेट्रोल-डिझेलही आवाक्याबाहेर चालले आहे. सरकारने यावर काहीतरी नियंत्रण आणायला हवे."***
***— स्थानिक वाहनधारक, सिरसाळा.***

# लोककलेचा जागतिक आवाज ठरलेले डॉ. गणेश चंदनशिवे यांची मुंबई विद्यापीठात प्रोफेसरपदी पदोन्नती

मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभागप्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांची मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागात प्रोफेसर पदावर पदोन्नती झाल्याने वसईसह मराठवाडा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. टेंभुर्णी (ता. जाफराबाद, जि. जालना) येथील सुपुत्र असलेले डॉ.गणेश चंदनशिवे गेल्या वीस वर्षांपासून मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीत कार्यरत असून लोककला, लोकसाहित्य आणि तमाशा परंपरेच्या अभ्यासाला त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे विचारपीठ मिळवून दिले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या मुंबई विद्यापीठाच्या वरिष्ठ निवड समितीच्या बैठकीत डॉ. गणेश चंदनशिवे यांची प्रोफेसर पदावर एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या या यशामुळे वसईकरांच्यासह मराठवाडयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. गणेश चंदनशिवे यांचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण टेंभुर्णी येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून नाट्यकलेचे शिक्षण घेतले. तमाशा लोककला या विषयावर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून पीएच.डी. संपादन केली. लोककला हा त्यांचा अभ्यासाचा मुख्य विषय असून तमाशा आणि लोकपरंपरा या विषयांवरील त्यांचे संशोधन विशेष मानले जाते.

लोककलेच्या जतन आणि संवर्धनासाठी त्यांनी सातत्याने संशोधनपर कार्य केले असून विविध अभ्यास मंडळांवर सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत. भारतातील विविध विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना लोककलेचा अभ्यास कसा करावा याबाबत ते मार्गदर्शन व प्रशिक्षण देत असतात. परदेशात भारतीय लोककलेचे महत्त्व पोहोचविण्यातही त्यांचा मोलाचा वाटा आहे.

लोकसाहित्य आणि लोककला क्षेत्रात त्यांची मोठी ग्रंथसंपदा असून विविध साहित्य संमेलनांमध्ये त्यांनी अध्यक्ष म्हणून भूमिका



बजावली आहे. विविध वृत्तवाहिन्यांवरील त्यांच्या मुलाखती विशेष चर्चेत राहिल्या असून एबीपी माझाच्या "माझा कट्टा" या कार्यक्रमातील त्यांची मुलाखतही विशेष गाजली होती. अनेक हिंदी व मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी पार्श्वगायन करून कलाक्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. गणेश चंदनशिवे म्हणाले, "वसई ही माझी जन्मभूमी नसली तरी ती माझी कर्मभूमी आहे. वसईचे ऋण मी कधीही विसरणार नाही. याच भूमीने मला उभारी दिली आणि प्रगतीचा मार्ग दाखविला." लोककलेचा खरा वारसा जपत वसई आणि पालघर परिसराचे नाव देश-विदेशात पोहोचविणाऱ्या डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या प्रोफेसर पदावरील पदोन्नतीमुळे लोककलेचाही एका अर्थाने गौरव झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यमान महापौर अजीव पाटील,माजी आमदार हितेंद्र ठाकूर ,

साहित्यजल्लोष प्रतिष्ठानचे संदेश भाऊ जाधव, डिंपल प्रकाशनचे अशोक मुळे यांचेसह अनेकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# विश्व फाउंडेशन व दैनिक लोकनेता परिवाराच्या संयुक्त विद्यमानाने सामाजिक उपक्रम

**सिंदखेड राजा | सुरेश हुसे**

तालुक्यातील सावखेड तेजन येथे दैनिक लोकनेता परिवाराच्या वतीने तसेच विश्व फाउंडेशनच्या नियोजनातून श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांसाठी मोफत 'हयात प्रमाणपत्र' (Life Certificate) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.. ग्रामीण भागातील वृद्ध, विधवा, परित्यक्ता तसेच दिव्यांग नागरिकांना शासकीय प्रक्रियेसाठी होणारी धावपळ थांबविणे आणि आर्थिक फसवणुकीपासून त्यांचे संरक्षण करणे हा या सामाजिक उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सिंदखेड राजाचे तहसीलदार अजित दिवटे यांनी लाभार्थ्यांना गावपातळीवर सुविधा उपलब्ध करून देण्याचे केलेले आवाहन लक्षात घेऊन दैनिक लोकनेता परिवार आणि विश्व फाउंडेशनने संयुक्तपणे हा लोकाभिमुख उपक्रम हाती घेतला आहे. "आपली सेवा, हीच आमची ओळख" तसेच "आपलं गाव, आपली जबाबदारी" या सामाजिक भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरात मोठ्या प्रमाणात स्वागत झाले.

श्रावणबाळ, संजय गांधी निराधार तसेच इतर सामाजिक सुरक्षा योजनांतील लाभार्थ्यांना दरवर्षी हयात प्रमाणपत्रासाठी विविध कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागतात. अनेक वृद्ध व दिव्यांग नागरिकांना प्रवासाचा त्रास सहन करावा लागतो. काही वेळा एजंट किंवा खासगी केंद्रांमार्फत आर्थिक फसवणूक होत असल्याच्या तक्रारीही पुढे येतात. हीच बाब लक्षात घेऊन गावातच मोफत सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत तसेच आकाश गायकवाड आणि विशाल ढाकणे यांनी लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र काढण्यासाठी विशेष सहकार्य केले आहे. लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाइन प्रक्रिया तसेच मार्गदर्शन करून त्यांना तत्काळ सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

हे शिबिर सावखेड तेजन येथील आईचे मंदिर येथे शनिवार व रविवार या दोन दिवसांत सकाळी ९ ते दुपारी ११ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह, विशेषतः आधार कार्ड घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले होते.

विश्व फाउंडेशनच्या नियोजनामुळे शिबिराचे व्यवस्थापन अधिक सुलभ व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. लाभार्थ्यांना तत्काळ सेवा देण्यावर भर दिला गेला. गावपातळीवर अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे सामाजिक योजनांचा लाभ थेट गरजूंपर्यंत पोहोचण्यास मदत होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या उपक्रमामुळे गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांगांना मोठा दिलासा मिळाला असून सामाजिक बांधिलकी जपत लोकाभिमुख कार्य करण्याचा आदर्श दैनिक लोकनेता परिवार आणि विश्व फाउंडेशनने निर्माण केल्याची प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.





***'हयात प्रमाणपत्र' काढण्यासाठी येरझारा घालने व नागरिकांची आर्थिकलूट ही बाब लक्षात घेऊन विश्व फाउंडेशन व दैनिक लोकनेता परिवाराने हा सामाजिक उपक्रम राबवला, नागरिकांनी या उपक्रमाला प्रतिसाद दिला. सावखेड तेजन येथील याच उपक्रमाची दखल घेत तालुक्यातील इतर ठिकाणी देखील अशा प्रकारे शिबिर आयोजित करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. विश्व फाउंडेशन व दैनिक लोकनेता परिवार यांच्या वतीने तालुकाभर असे उपक्रम राबवणार येणार आहे.***
***- ज्ञानेश्वर बुधवत अध्यक्ष विश्व फाउंडेशन***

# डॉ. बळीराम पांडे : प्रबोधनाचा प्रेरणास्त्रोत

मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण देशभर आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या देवगिरी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागात कार्यरत असलेले आमचे जिवलग सन्मित्र, संघर्ष योद्धा, विचारवंत, साहित्यिक तथा प्रबोधनाचा प्रेरणास्त्रोत प्रा. डॉ. बळीराम पांडे यांचा २० मे हा जन्मदिन. या निमित्ताने त्यांच्या संघर्षमय, प्रेरणादायी आणि समाजाभिमुख जीवनप्रवासाकडे पाहताना मन अभिमानाने भरून येते.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले. संकटे, अभाव, संघर्ष आणि जीवनातील असंख्य वादळांना सामोरे जात त्यांनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडविले. सामान्य परिस्थितीतून असामान्य उंची गाठणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये डॉ. बळीराम पांडे यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. आज ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, जीवाला जीव देणारे मित्र, एकनिष्ठ कार्यकर्ते, अभ्यासू विचारवंत आणि कुशल संघटक म्हणून सर्वपरिचित आहेत.

मराठवाड्यातील शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. परिवर्तनवादी विचारांचा ध्यास घेत त्यांनी आयुष्यभर समाजप्रबोधनाची मशाल प्रज्वलित ठेवली



आहे. त्यांच्या पायाला जणू भिंगरीच लागलेली आहे; कारण विश्रांतीपेक्षा समाजकार्य त्यांना अधिक प्रिय आहे. त्यामुळे त्यांच्या आयुष्याची गाथा शब्दबद्ध करणे हे खरोखरच कठीण कार्य आहे. मात्र असे प्रेरणादायी आयुष्य इतिहासाच्या पानांवर नोंदले गेलेच पाहिजे, असे मनापासून वाटते.

डॉ. पांडे यांचे जीवन म्हणजे संघर्षातून उभ्या राहिलेल्या एका नायकाची प्रेरणादायी कहाणी होय. अनेक संकटे, अडथळे, अवहेलना आणि कठीण प्रसंग आले, पण त्यांनी कधीही हार मानली नाही. चिकाटी, जिद्द आणि ध्येयवादी वृत्तीच्या बळावर ते आजही तितक्याच ताकदीने समाजकार्यात उभे आहेत. त्यांच्या जगण्याचा समग्र पट हा एका संघर्षशील योद्धयाचा जीवनप्रवास अधोरेखित करतो.

शिक्षणक्षेत्र त्यांच्या हृदयाच्या अत्यंत जवळ आहे. बालपणीचा "बळी" नावाचा एक सामान्य मुलगा ते प्रा. डॉ. बळीराम पांडे होईपर्यंतचा त्यांचा प्रवास हा केवळ वैयक्तिक यशाचा नाही, तर ज्ञानाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडविण्याच्या ध्येयाचा प्रवास आहे. ज्ञान हेच समाजाच्या मुक्तीचे प्रभावी साधन आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. शिक्षण हा न्यायी, समताधिष्ठित आणि प्रबुद्ध समाजाचा पाया आहे, ही त्यांची विचारधारा त्यांच्या प्रत्येक कृतीतून प्रकर्षाने दिसून येते.

बुद्ध, शिवराय, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचे ते प्रखर अभ्यासक आणि वाहक आहेत. ही परिवर्तनवादी विचारधारा जनमानसात पोहोचावी, समाजात समता, बंधुता आणि मानवता रुजावी यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

जन्मोत्सवाच्या आभाळभर शुभेच्छा..!

**प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे (9822846675)**

# मौलाना आझाद महामंडळाचे कार्यालय शासकीय की खाजगी?; मनसेकडून महापुरुषांचे फोटो भेट देणार – वर्षाताई जगदाळे

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांच्या कार्यालयातील कारभाराबाबत गेल्या काही दिवसांपासून विविध चर्चांना उधाण आले आहे. एका कामानिमित्त कार्यालयाला भेट दिल्यानंतर या चर्चांमध्ये तथ्य असल्याचे दिसून आल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेना राज्य उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांनी केला आहे.

वर्षाताई जगदाळे यांनी सांगितले की, शासकीय कार्यालयांमध्ये महापुरुषांचे छायाचित्र लावण्याची परंपरा असताना, संबंधित कार्यालयात अधिकाऱ्यांनी स्वतःच्या गौरवाचे आणि सत्काराचे फोटो लावले आहेत. हे फोटो महापुरुषांच्या छायाचित्रांपेक्षा अधिक ठळकपणे लावण्यात आल्याने, "हे कार्यालय शासकीय आहे की खाजगी?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने कार्यालयाला महापुरुषांची छायाचित्रे भेट देऊन योग्य शिस्त लावण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, कार्यालयातील कथित गोंधळ आणि भ्रष्टाचाराबाबत सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे. कोणत्या अधिकाऱ्याने किती फायली काढली, किती लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला, याची माहिती संकलित केली जात असून, लवकरच या प्रकरणी जनहित याचिका दाखल करण्यात येणार असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी सांगितले.गोरगरीब आणि गरजू नागरिकांना न्याय मिळावा, तसेच शासकीय योजनांचा लाभ पारदर्शक पद्धतीने मिळावा, यासाठी हा लढा सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, बुधवार, 20 मे 2026

# सिरसाळा येथे बुद्धरूप अनावरण व बुद्ध विहार लोकार्पण सोहळ्याचे आयोजन

## ना. संजय शिरसाट,ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे तसेच डॉ. हर्षवर्धन कांबळे

## मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रम; आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा रंगणार जल्लोष




**परळी | प्रतिनिधी :**

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे रविवार दि. २४ मे २०२६ रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बुद्धरूपाचे अनावरण तसेच सम्राट अशोक बुद्ध विहाराच्या लोकार्पणाचा भव्य दिव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवानिमित्त परिसरात उत्साहाचे आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले असून पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.

सम्राट अशोक बुद्ध विहार, कुशी नगर, सिरसाळा येथे होणाऱ्या या कार्यक्रमास विविध मान्यवर, भन्तेजी, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. आयोजकांनी सर्व नागरिकांना उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता पंचशील धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करून होणार असून पूज्य भन्ते डॉ. धम्मप्रिय महास्थवीर (अध्यक्ष, भीम जन्मभूमी महू, मध्यप्रदेश) यांच्या हस्ते हा विधी पार पडणार आहे. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता बुद्ध जयंतीच्या पावन पर्वावर बुद्ध रूपाची भव्य शोभायात्रा सम्राट अशोक बुद्ध विहारातून प्रारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गाने भ्रमण करीत पुन्हा विहारात दाखल होईल. सकाळी ११.३० वाजता पूज्य भिक्खू संघदान व उपासकांना भोजनदानाचा कार्यक्रम होणार आहे.

दुपारच्या सत्रात पूज्य भन्ते डॉ. धम्मप्रिय महास्थवीर यांच्या शुभहस्ते बुद्ध रूपाचे अनावरण करण्यात येणार आहे. यावेळी विविध भन्तेजींची प्रमुख उपस्थिती लाभणार असून धम्मदेशना देखील आयोजित करण्यात आली आहे.

सायंकाळी ७ वाजता सम्राट अशोक बुद्ध विहार लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे माजी सामाजिक न्याय मंत्री आ. धनंजय मुंडे राहणार आहेत. उद्घाटक म्हणून सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य ना. संजय शिरसाट साहेब उपस्थित राहणार आहेत.

विशेष उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन तथा पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे तसेच प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन डॉ. हर्षवर्धन कांबळे उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवात महाराष्ट्राच्या आवाजाचा बादशाह म्हणून प्रसिद्ध असलेले ख्यातनाम गायक आनंदजी शिंदे यांच्या प्रभावी उपस्थितीत भीम गीतांचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून तो या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी तसेच बौद्ध समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सम्राट अशोक बुद्ध विहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, यशोधरा महिला मंडळ सिरसाळा यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

आयोजकांनी पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बुद्ध व धम्माच्या या प्रेरणादायी सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# डॉ. श्रीगणेश मुंडे यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव

**परळी | प्रतिनिधी:**

परळी वैजनाथ येथील मूळ रहिवासी तथा महानिर्मिती कंपनीमध्ये कार्यरत असलेले डॉ. श्रीगणेश महादेव मुंडे यांना प्रशासकीय कार्य, मानव संसाधन व्यवस्थापन, सुनियोजन आणि सामाजिक बांधिलकीच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून गौरविण्यात आले आहे.

आयएफईए संस्थेच्या वतीने उत्कृष्ट प्रशासकीय व मानव संसाधन व्यवस्थापन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. तसेच ग्लोबल एक्सेललेन्स समिट २०२६ तर्फे त्यांच्या विशेष कार्याबद्दल अभिनंदन पत्र देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या सर्वांगीण कार्याची दखल घेत अमेरिकन मॅनेजमेंट युनिव्हर्सिटीने त्यांना मानद पीएच.डी. पदवी प्रदान करून सन्मानित केले आहे.

डॉ. श्रीगणेश मुंडे यांनी D. Pharm, B. Pharm, MBA (HR) तसेच YCMOU अंतर्गत PhD Scholar म्हणून शिक्षण घेतले आहे. सध्या महानिर्मिती कंपनीच्या मुख्यालय मुंबई येथे मुख्य लिपिक म्हणून ते कार्यरत असून यापूर्वी त्यांनी जिल्हा परिषद जालना येथे औषध निर्माण अधिकारी तसेच परळी वैजनाथ थर्मल विद्युत केंद्रात विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत.

राष्ट्रीय वीज कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित येथे बिनविरोध संचालक म्हणून निवड झाल्यानंतर ते सचिव पदाची जबाबदारीही समर्थपणे पार पाडत आहेत. कामगारांचे प्रश्न मार्गी लावणे, कार्यालयीन सहकाऱ्यांशी आत्मीयतेने वागणे, सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय सहभाग घेणे आणि गरजूंना मदत करणे




या माध्यमातून त्यांनी एक संवेदनशील व लोकाभिमुख अधिकारी म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे.

विद्यार्थीदशेत एनएसएसमधील उल्लेखनीय कार्य, रक्तदान शिबिरातील सक्रिय सहभाग तसेच सेवाकाळात उत्कृष्ट कार्याबद्दल विविध मुख्य अभियंत्यांच्या हस्ते त्यांना अनेक पुरस्कार, प्रशस्तीपत्रे व गौरवपत्रे प्राप्त झाली आहेत. दैनिक सोमेश्वर साथीच्या वर्धापन दिनानिमित्त त्यांना "समाजरत्न" पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे.

प्रशासकीय कार्यक्षमता, सामाजिक जाणीव आणि माणुसकीची सांगड घालणारे व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. श्रीगणेश मुंडे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# महत्त्वाची व्यावसायिक संधी : परळी वैजनाथ नगर परिषदेकडून व्यापारी संकुलातील दुकानांचा ई- लिलाव जाहीर ; २७ दुकाने उपलब्ध

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**




परळी वैजनाथ नगर परिषदेकडून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलाजवळ उभारण्यात आलेल्या व्यापारी संकुलातील दुकानांच्या सार्वजनिक ई-लिलावाची घोषणा करण्यात आलेली आहे. शहरातील व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून, या ठिकाणी २७ दुकाने उपलब्ध आहेत. इच्छुक व्यापाऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने सहभाग नोंदविता येणार आहे.

नगर परिषदेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार, ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी आपल्या आवडीच्या दुकानाची पाहणी करून नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी शासनाच्या अधिकृत www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे. तसेच डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट, शॉप ॲक्ट परवाना अथवा उद्योग प्रमाणपत्र आणि नगरपालिकेचे थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहणार आहे. लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्याची अंतिम मुदत २५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. प्रत्यक्ष ई-लिलाव प्रक्रिया २९ मे २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. निविदा शुल्क ५ हजार रुपये (ना-परतावा) तर अनामत रक्कम ५० हजार रुपये (परतावा) ठेवण्यात आली आहे.

प्रत्येक दुकानासाठी स्वतंत्र टेंडर भरावे लागणार असून सर्वाधिक बोली लावणाऱ्या व्यापाऱ्यास दुकान सोपविण्यात येईल. प्रत्येक दुकानाचे शासकीय मूल्यांकन किमान २० लाख रुपयांपासून पुढे निश्चित करण्यात आले आहे. निवड झालेल्या निविदाधारकांनी एकूण रकमेपैकी ५० टक्के रक्कम ३० दिवसांच्या आत भरावी लागणार असून उर्वरित ५० टक्के रक्कम पुढील ६० दिवसांत दोन टप्प्यांत जमा करावी लागणार आहे. संपूर्ण रक्कम भरण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. या व्यापारी संकुलात एकूण २७ दुकाने उपलब्ध असून प्रत्येक दुकानासाठी मासिक भाडे ४ हजार रुपये निश्चित करण्यात आले आहे. हे संकुल डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलाजवळ उभारण्यात आले असून शहरातील व्यापाऱ्यांसाठी ही एक महत्त्वाची व्यावसायिक संधी आहे.निविदा (टेन्डर) भरण्याकरिता १. भन्साळी कॉम्प्युटर्स 9923702345, २. सोमेश्वर एन्टरप्रायजेस 8087830003, ३. रुद्राज एन्टरप्रायजेस 9405464368 याठिकाणी इच्छुक संपर्क साधू शकतात. व्यापाऱ्यांसाठी ही एक महत्त्वाची व्यावसायिक संधी असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन नगर परिषद परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# धोंडीराम रोडे गुरुजी प्रतिष्ठानचा प्रेरणादायी उपक्रम

## दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

"मार्कवर नव्हे तर गुणांवर भर द्या... शिक्षण हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे!"असा प्रेरणादायी संदेश देत धोंडीराम रोडे गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने भीमनगर परिसरातील दहावी व बारावी परीक्षेत उत्तम यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात वैद्यनाथ विद्यालयाचे आदर्श शिक्षक सुनील देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "शिक्षणाच्या जोरावर कोणत्याही क्षेत्रात मोठे यश संपादन करता येते. मेहनत, जिद्द आणि सातत्य हेच यशाचे सूत्र आहे." कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष वैजनाथ तात्या जगतकर उपस्थित होते. तसेच समाजसेवक तथा युवा नेते भारत ताटे, सूत्रसंचालक आनंद तूपसमुद्रे, राहुल ताटे, बापू ताटे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे प्रमुख मिथुन रोडे, आकाश साळवे व सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

"विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव म्हणजे समाजाच्या उज्ज्वल भविष्यास बळ देणे" असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

